# महाराष्ट्र शासन
# प्रवेश नियामक प्राधिकरण

८वा मजला, न्यु. एक्सलसियर
बिल्डींग, ए.के. नायक मार्ग,
फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.maha-ara.org
ईमेल : maharashtra.ara@gmail.com

**महत्वाचे / कालमर्यादा / ईमेलद्वारे**

क्रमांकः संकीर्ण/प्र.क्र.१७०/प्रनिप्रा, /२८७ दिनांक : 3 0 NOV 2018

## "परिपत्रक"

प्रति,
अधिष्ठाता/प्राचार्य,
सर्व खाजगी व विनाअनुदानित
व्यावसायिक अभ्यासक्रमाची महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश पडताळणीचे कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याबाबत....**

**संदर्भ :**
1. **प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या दिनांक २९ नोव्हेंबर २०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७**
2. **प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाचे पत्र क्र. संकीर्ण/ प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/२६३, दिनांक १५/११/२०१८.**
3. **प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाचे पत्र क्र. संकीर्ण/ प्र.क्र.१७०/प्रनिप्रा/१९८, दिनांक ९/१०/२०१८.**
4. **प्रवेश नियामक प्राधिकरण कार्यालयाचे दिनांक ३१/१०/२०१८ रोजीचे परिपत्रक.**

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश नियामक प्राधिकरणाकडील प्रवेश प्रक्रियेचे संपूर्ण कामकाज संगणीकृत प्रणालीने करण्याच्या अनुषंगाने "नोंदणी प्रक्रिया" पूर्ण करण्याकरिता संबंधीत महाविद्यालयांना यापूर्वी प्राधिकरणाच्या संदर्भ क्र. २ ते ४ येथील पत्रान्वये मूदत वाढ देण्यात आली होती. तथापि, अद्याप अनेक महाविद्यालयांनी नोंदणी प्रक्रिया पूर्ण न केल्याच्या अनुषंगाने सादर केलेल्या विनंतीस अनुसरुन तथापि, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन प्रवेश नियामक प्राधिकरणाने दिनांक २९/११/२०१८ रोजीच्या बैठकीतील निर्णय बाब क्र. ७ नुसार प्राधिकरणाच्या ऑनलाईन पोर्टलवर महाविद्यालय नोंदणी प्रक्रिया, प्रवेश प्रक्रियेची माहिती सादर करणे, प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश पडताळणी, प्रक्रिया शुल्काचा भरणा व प्रवेश मान्यतेच्या प्रक्रियेकरिता खालील प्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निर्देश दिले आहेत.

| अ. क्र. | प्रक्रिया | कालावधी |
|---|---|---|
| १ | नोंदणी प्रक्रिया (प्रति विद्यार्थी रु. २०००/- व जास्तीत जास्त रु. ५०,०००/-) | दिनांक १/१२/२०१८ ते ५/१२/२०१८ |
| २ | प्रवेशित विद्यार्थ्यांचे आवश्यक प्रमाणपत्र व प्रक्रिया शुल्काचा भरणा | दिनांक ५/१२/२०१८ पर्यंत (विना विलंब शुल्क) |
| ३ | २०% विलंब शुल्कासह प्रवेशित विद्यार्थ्यांचे आवश्यक प्रमाणपत्र व प्रक्रिया शुल्काचा भरणा करण्याची प्रक्रिया | दिनांक ६/१२/२०१८ ते ३१/१२/२०१८ |
| ४ | ४०% विलंब शुल्कासह प्रवेशित विद्यार्थ्यांचे आवश्यक प्रमाणपत्र व प्रक्रिया शुल्काचा भरणा करण्याची प्रक्रिया | दिनांक १/०१/२०१९ ते १५/०१/२०१९ |
| ५ | अ) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील कलम ९ (५) च्या तरतूदींनुसार संबंधीत संचालकांनी सादर करावयाच्या प्रवेश पडताळणीचा अहवाल | दिनांक ३१/१२/२०१८ पर्यंत |
| | ब) विलंब शुल्कासह सादर झालेल्या प्रवेश पडताळणीचे प्रस्ताव | दिनांक २५/०१/२०१९ पर्यंत |

वरील प्रक्रियेसंबंधी अधिक माहितीकरिता दूरवध्वनी क्र. ०२०-६७६३५९९९ (Direct), ०२२-२२०१६१५३, ०२२-२२०१६१५७, ०२२-२२०१६१५९ (Ext. No. 272) व ara.helpline@gmail.com हा ईमेल संपर्कासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ मधील तरतूदींचे गांभीर्य लक्षात घेऊन, वरील वेळापत्रकानुसार महाविद्यालयांनी व संबंधीत संचालकांनी कार्यवाही करणे बंधनकारक आहे, तद्नंतर या संदर्भात प्राप्त होणाऱ्या विनंती/निवेदनांचा विचार केला जाणार नाही, **तसेच तद्नुषंगाने ज्या महाविद्यालयातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेशास मान्यतेअभावी भविष्यात उद्भवणाऱ्या अडचणींस संबंधीत महाविद्यालय/संस्था व संचालक जबाबदार राहतील,** याची कृपया नोंद घ्यावी.

(आ.ए. रायते) भा.प्र.से.
**सचिव,**
**प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.**

प्रत माहितीकरिता अग्रेषित,-
मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत वरीप्रमाणे आवश्यक कार्यवाहीकरिता तथा उक्त निर्देश संचालकांनी त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याच्या विनंतीसह अग्रेषित,-
१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई.

२. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई.
३. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.
४. संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे
५. संचालक, कला शिक्षण संचालनालय, मुंबई.
६. संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन, पुणे
७. कुलसचिव, पशू व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपुर

प्रत,-
१. मा. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे स्वीय सहाय्यक,
२. निवडनस्ती, प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई.